REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# चंद्रपूर जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत राबविण्यात येणारा राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाचा अभ्यास

प्रियंका डी. शंभरकर
अर्थशास्त्र विभाग

## प्रस्तावना :

"He who has health, has hope and he who has hope, has everything" *आरोग्यासंबंधी हे विधान मुलतः अरबी भाषेतील आहे. या विधानाचा अर्थ असा की, जो आरोग्य संपन्न आहे. तो आशा करु शकतो आणि जो आशावादी आहे त्याच्याकडे सर्व काही आहे. याचाच अर्थ असा की, ज्या व्यक्तीचे जीवन आरोग्यदायी आहे, त्या व्यक्तीकडे जीवन जगण्यासाठी सर्व काही आहे. मनुष्य हा सतत आशेवर जीवन जगत असतो व आशा जीवनाला प्रेरणा देणारा, प्रोत्साहन देणारा आरोग्य हा महत्वाचा घटक आहे.* (Who) *जागतिक आरोग्य संघटनाने केलेली आरोग्य या संकल्पनेची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.*

*''आरोग्य म्हणजे शारिरीक, मानसिक आणि सामाजिक दृष्टीकोनातून सुस्थित अशी व्यवस्था होय न रोग वा दुबळेपणा यांचा अभाव होय''*

Health is defined by who as a state of complete physical mental and social well being and not merely absence of disease or infirmity.

*संस्कृत भाषेत एक वचन आहे. ''शरीरम आद्य खलु धर्मसाधनम्'' याचाच अर्थ असा की, निकोप प्रकृती ही कर्तव्यपूर्तीची पहिली गरज आहे. उत्तम आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिध्द हक्क आहे तर प्रत्येक व्यक्तींची योग्य प्रकृती राखणे ही समाजाची म्हणजेच पर्यायाने सरकारची जबाबदारी आहे.*

*आरोग्यसेवा केवळ प्रदान करुन चालत नाही तर त्या गरीब लोकांपर्यंत त्यांना परवडतील अशा स्वरुपात पोहचविणे महत्वाचे असते. भारतात सरकारी रुग्णालयात मोफत औषधोपचार केला जातो. पण अशा सरकारी रुग्णालयांची संख्या मर्यादित आहे. ज्या रुग्णालयात मोफत औषधोपचाराच्या सेवा व सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे या सेवेचा लाभ सर्वसामान्यांना घेता येत नाही. समजा एखाद्या अत्यंत गरीब कुटुंबातील स्त्रिचे बाळंतपण अवघड असेल व त्या परिसरातील आरोग्य केंद्रात तिचे बाळंतपण सुखरुप होण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या सुविधा जर उपलब्ध नसतील तर त्या स्त्रिला तालुक्याच्या रुग्णालयात हलविणे अत्यावश्यक ठरते. परंतु त्यासाठी लागणारा खर्च करण्याइतकी ऐपत जर संबंधीत कुटुंबाची नसेल तर त्या गर्भवती स्त्रिचे व तिच्या पोटी जन्माला येवु पाहणाऱ्या नवोदित अर्भकाचे आरोग्य नव्हे तर आयुष्यपण धोक्यात येऊ शकते.?*

*राष्ट्राच्या आर्थिक स्थितीव्यतीरिक्त व्यक्तीची म्हणजेच पर्यायाने कुटुंबाची आर्थिक स्थिती व आरोग्य संरक्षण यांचा फार जवळचा संबंध आहे. आज आरोग्यविषयक सेवा इतक्या महाग झाल्या आहेत की, सर्वसामान्य आर्थिक स्थिती असणाऱ्या नागरिकांना त्यांचा लाभ घेता येत नाही. थोडक्यात असे म्हणता येईल की, देशाची आर्थिक परिस्थिती, कुटुंबाचे*

आर्थिक उत्पन्न व आरोग्य संवर्धन यांचा जवळचा संबंध आहे.

आज आपल्या देशात ग्रामीण भागाबरोबरच आदिवासी दुर्गम भागात आरोग्य व आरोग्य सुविधांच्या बाबतीत खुप समस्या आहेत. सर्वांसाठी आरोग्य हे सरकारचे धोरण असून त्यांची अंमलबजावणी मात्र आवश्यक त्या प्रमाणात होत नाही. शहरी भागापेक्षा आरोग्य सुविधांची उणीव किंवा कमतरता हि ग्रामीण व आदिवासी दुर्गम भागात मोठ्या प्रमाणात जाणवते. ग्रामीण, दुर्लक्षित तसेच गरजू ग्रामीण जनतेस सहज साध्य परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरदायी आणि विश्वासर्ह आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपुर्ण देशात 12 एप्रिल 2005 पासुन 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान' सुरु करण्यात आले. ग्रामीण विभागात मोडणाऱ्या व आदिवासी लोकांचे वास्तव्य असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण अभियान कार्यरत आहे. NRHM च्या कार्यप्रणाली अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात 1 जिल्हास्तरीय रुग्णालय (District Hospitalद्ध, 02 उपजिल्हास्तरीय रुग्णालय (Sub-District Hospital), 11 ग्रामीण रुग्णालय (Rural Hospital), 58 प्राथमिक आरोग्य केंद्र (PHCs) कार्य करतात.

1 मे 2013 रोजी केंद्रीय मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यक्रमाला राष्ट्रीय आरोग्य अभियान करुन राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान व राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान असे विभाजन करण्यात आले. आरोग्य व कुटुंब मंत्रालयाअंतर्गत हे अभियान 2005 ते 2012 या 7 वर्षासाठी सुरु करण्यात आले होते. आता याचा कालावधी 2017 वरुन 2020 पर्यंत करण्यात आला आहे.

## • चंद्रपूर जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान :

राज्यामध्ये आरोग्य संस्थाचे जाळे असून आरोग्य सेवेची त्रिस्तरीय योजना राज्यात राबविली जाते व या योजनेमार्फत ग्रामीण जनतेला विशेषतः गरीब व जोखमीच्या लोकांना गुणवत्तापुर्ण आरोग्य सेवा पुरविल्या जातात. चंद्रपूर जिल्ह्यात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण जनतेस गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा पुरविण्याचे उद्देशाने जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर आणि गावपातळीवर विविध योजना राबविल्या जातात. या विविध योजनांपैकी चंद्रपूर जिल्ह्यात बालकांच्या सर्वांगिण विकासाकरीता राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राबविला जातो.

## • *संशोधनाची उद्दिष्ट्ये :*

1) चंद्रपूर जिल्ह्यात NRHM अंतर्गत राबविण्यात येणारा राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम कशा प्रकारे कार्यरत आहे हे जाणुन घेणे.

2) चंद्रपूर जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमावरील झालेला खर्च व लाभार्थ्यांचा अभ्यास करणे.

## • *संशोधन माहिती संकलन व संशोधन पध्दती :*

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा आधार घेण्यात आला आहे. प्राथमिक स्त्रोतात प्रत्यक्ष मुलाखती अनुसुचीचा उपयोग केला तर दुय्यम स्त्रोतात प्रकाशित अहवाल व प्रत्यक्ष NRHM व Civil Hospital कार्यालयीन उपलब्ध साहित्याचा उपयोग केला आहे.

## • *राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम :*

0 ते 18 वर्ष वयोगटातील बालक व विद्यार्थ्यांना एकात्मिक पध्दतीने वर्धित आरोग्य सेवा देण्याच्या उद्देशाने 6 फेब्रुवारी 2013 पासुन राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम सुरु करण्यात आला. फेब्रुवारी 2013 मध्ये महाबलीपुरम (तामिळनाडु) येथे आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयात Call to Action for child survival and development ही राष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. या परिषदेत युनिसेफ व युएसएड या संस्था देखील सहभागी होत्या. या परिशदेला अनुसरुन व RMNCH + A (Reproductive, Material, Newcomb, Child and Adolescent Health) धोरणाला अनुसरुन ही योजना सुरु करण्यात आली.

*राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम हा मुलांच्या आरोग्याचे संवर्धन व विकास साधण्यासाठी उचलेले अत्यंत महत्वपुर्ण पाऊल आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातुन बालकांच्या आरोग्याची तपासणी व त्यांच्या आढळणाऱ्या आजारांना वेळीच पायबंद घालणे हा मुख्य उद्देश समोर ठेवण्यात आला आहे.*

*या कार्यक्रमात 0 ते 18 वयोगटातील मुलांची आरोग्य तपासणी करण्यासाठी राज्यात 1130 पथके कार्यरत आहेत. प्रत्येक पथकात 1 वाहन, 2 वैद्यकीय अधिकारी (1 पुरुश व 1 स्त्री), 1 आरोग्यसेविका व 1 औषधनिर्माता यांचा समावेश असतो. तालुका स्तरावरील ग्रामीण/उपजिल्हा रुग्णालये येथे या पथकांचे मुख्यालय करण्यात आले आहे. सध्या या पथकांव्दारे ग्रामीण व शहरी भागातील अंगणवाडीतील बालकांची व शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. वर्ष 2015–16 मध्ये राज्यात कार्यक्रमाअंतर्गत एकुण 2349974 मुलांची तपासणी करण्यात आली असुन एकुण 85489 मुलांना पुढील तपासणी करीता संदर्भात करण्यात आले आहे.*

- ***चंद्रपूर जिल्ह्यातील राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमाबाबतची माहिती :***

*ि जल्ह्यात राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमाची सुरुवात दिनांक 1 एप्रिल 2013 ला करण्यात आली. राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत अंगणवाडी व शाळेतील 0 ते 18 वयोगटातील बालकांची तपासणी करण्यात येते. कार्यक्रमाअंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात एकुण 24 पथक कार्यरत असुन त्यांना तपासणी करीता वाहन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाअंतर्गत शाळा तपासणी वर्षातुन एकदा व अंगणवाडी तपासणी सहा महिण्यातुन एकदा करण्यात येते. तपासणी दरम्यान किरकोळ आजारी बालकांवर अंगणवाडी शाळेतच औषधोपचार करण्यात येते. ज्यांचे उपचार अंगणवाडीत/शाळेत होवु शकत नाही. अशा बालकांना प्राथमिक आरोग्य केंद्र/ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय/जिल्हा रुग्णालयाला संदर्भीत करुन त्यांच्यावर उपचार करण्यात येते.*

- ***उद्देश :***

*राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जन्मतः व्यंग असणारे आजार, जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे होणारे आजार, बालपणातील आजार व शारिरीक आणि बौध्दीक विकासात्मक वाढीतील होणारे आजार इत्यादी आजार असणाऱ्या बालकांवर वेळेवर निदान व लवकर उपचार करणे हे आहे.*

- ***राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या पथकाची माहिती :***

*राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या पथकाची माहिती*

| अ. क्र. | पदाचे नाव | मंजुर पद | भरलेले पद | रिक्त पद |
|---|---|---|---|---|
| 1. | वैद्यकीय अधिकारी (पु.) | 24 | 15 | 09 |
| 2. | वैद्यकीय अधिकारी (स्त्री) | 24 | 18 | 06 |
| 3. | परिचारीका | 24 | 23 | 01 |
| 4. | औषध निर्माता | 24 | 23 | 01 |
| एकुण | | 96 | 79 | 17 |

**स्त्रोत :** NHM *कार्यालय चंद्रपूर*

*चंद्रपूर जिल्ह्यातील राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत नियुक्त कर्मचाऱ्याच्या पदसंस्थेचा तपशिल वरिल तक्त्यात दर्शविलेला आहे. कार्यक्रमाकरिता आवश्यक कर्मचाऱ्यांचे मंजुर पद संख्या 96 असुन 79 पद भरलेले आहेत आणि 17 पद हे रिक्त स्वरुपात बघावयास मिळतात. निष्कर्श असा की, जिल्ह्यातील बालकांची संख्या व त्यांची आरोग्य स्थिती लक्षात घेता जिल्ह्यात आरोग्य सेवा चांगल्या तऱ्हेने उपलब्ध करुन देण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करणे आवश्यक आहे.*

**जिल्ह्यातील राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाकरिता मंजुर अनुदान व झालेला एकुण खर्च व झालेल्या शस्त्रक्रिया व तपासणी संख्या**

| वर्ष | झालेल्या विद्यार्थ्यांची तपासणी संख्या | प्राप्तनिधी | खर्चनिधी | करण्यात आलेल्या इतर शस्त्रक्रिया | करण्यात आलेल्या हदृय शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|
| 2013–14 | 410470 | 232.85 | 220.84 | 307 | 66 |
| 2014–15 | 450850 | 242.94 | 225.72 | 249 | 78 |
| 2015–16 | 456184 | 260.23 | 231.61 | 444 | 68 |
| 2016–17 | 446510 | 272.35 | 208.88 | 507 | 62 |
| 2017–18 | 448632 | 280.82 | 258.15 | 574 | 56 |

**स्त्रोत :** Civil Surgen Cell

वरिल तक्त्यात जिल्ह्यातील राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाची प्रगती दर्शविण्यात आलेली आहे. जिल्ह्यात 2013–14 मध्ये 140470 विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. तर 2017–18 मध्ये 38162 विद्यार्थी संख्येत वाढ करुन 448632 विद्यार्थ्यांची तपासणी केली. जिल्ह्यात हा कार्यक्रम राबविण्याकरीता शासनाकडुन निधीचा पुरवठा केला जातो. वरील तक्त्यातील विविध वर्षाखालील प्राप्त निधी व खर्च निधीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्राप्त निधीपेक्षा सर्व वर्षात खर्च निधीमध्ये तफावत दिसून येते. म्हणजे प्राप्त निधीतून कार्यक्रमावर होणारा खर्च कमी झालेला दिसुन येतो.

तसेच जिल्ह्यात बालकांवर झालेल्या शस्त्रक्रियेचा तपशिल बघता 2013–14 मध्ये इतर शस्त्रक्रिया 307 असुन हदृय शस्त्रक्रिया 66 होत्या. तेच 2017–18 मध्ये हे प्रमाण 574 व 56 झालेले बघावयास मिळते.

ह्या आकडेवारीवरुन राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाचे महत्व लक्षात येते. अशा प्रकारे दोष आढळलेल्या विद्यार्थ्यांवर कार्यक्रमाअंतर्गत महाराष्ट्र शासनाव्दारे मोफत औषधोपचार केला जातो. तसेच गंभीर (हदृय शस्त्रक्रिया) आजार आढळल्यास पुढील उपचाराकरिता विद्यार्थी रुग्णाला सोयी उपलब्ध करुन दिल्या जातात व शस्त्रक्रियेचा खर्च कार्यक्रमाच्या माध्यमातुन शासन करीत असते.

- **निष्कर्ष :**

1) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत आरोग्य तपासणी खाजगी शाळेत ऐच्छिकरित्या राबविले जाते व सरकारी शाळेत अनिवार्यपणे हा कार्यक्रम राबविला जातो.

2) कार्यक्रमाअंतर्गत गंभीर दोष आढळलेल्या विद्यार्थ्यांना सामान्य रुग्णालयात, ग्रामीण रुग्णालयात व जिल्हा रुग्णालयात संदर्भ सेवेकरिता पाठविले जाते.

3) ज्या रुग्ण विद्यार्थ्यांकरिता/बालकांकरिता शल्य चिकीत्सेची गरज असते. त्यांच्या पुढील कार्यवाहीकरिता निर्णय घेण्यास बराच विलंब होतो. कारण शल्य चिकित्सेकरिता किती खर्च येईल याविषयी माहिती रुग्णालयामधुन मागितली जाते व अशा प्रकारची कागदपत्रे मागविणे व पाठविण्यास बराच वेळ वाया जातो. त्यामुळे रुग्ण विद्यार्थ्यांवर लवकर निदान उपाययोजना होवु शकत नाही असे निदर्शनास येते.

- **संदर्भ ग्रंथसूची :**

1) कुलकर्णी बी. डी., ढमढरे एस. व्ही., ''अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती'' डायमंड पब्लिकेशन्स, नागपूर 2007.
2) बोधनकर सुधीर, अलोनी विवेक, कुलकर्णी मृणाल, ''सामाजिक संशोधन पध्दती'', साईनाथ प्रकाशन नागपूर 2014.
3) डॉ. कुलकर्णी पी. के., आरोग्य आणि समाज, डायमंड पब्लिकेशन्स.
4) आरोग्य सेवा – महाराष्ट्र पुस्तिका : महाराष्ट्र शासन.
5) NRHM कार्यालयीन वार्षिक अहवाल.
6) चंद्रपूर जिल्हा रुग्णालय वार्षिक अहवाल.